मा. कोर्ट

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** जवाहर नगर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0074 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 12/03/2022 22:18 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 12/03/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 12/03/2022

**Time From (वेळेपासून):** 15:20 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:20 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक ): 12/03/2022 **Time (वेळ):** 22:18 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No.** (नोंद क्र.): 020 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 12/03/2022 **22:18 बजे**

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** रिध्दी सिध्दी हलच्या समोर रोड,ल्कानगरी, औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** वैजनाथ अमतराव वाघमारे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1964 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घर नं17/1,मुकुंदनगर, नालंदा शाळेजवळ,ताजिऔरंगाबाद,जवाहर नगर,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घर नं17/1,मुकुंदनगर, नालंदा शाळेजवळ,ताजिऔरंगाबाद,जवाहर नगर,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री संजय राजाराम पाटील शाखा अभियंता सार्वजनिक बाधक | | | 1. D-1, गुरुगणेश अपार्टमेन्ट,रिध्दी सिध्दी हलच्या बाजुला,उल्कानगरी, औरंगाबाद ,जवाहर नगर,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादिनांक- 12-03-2022मी वैजनाथ अमृतराव वाघमारे, वय-58 वर्ष, व्यवसाय- डेकोरेशन. रा. मुकुंदनगर, नालंदा शाळेजवळ, घर नं. 17/18 ता.जि.औरंगाबाद.समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 10/03/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद येथे तक्रार दिली की, चार वर्षापुर्वी वाय पी डेव्हेलपर्स औरंगाबाद यांना मुकूंदनगर, येथील मारुती मंदीराच्या सभागृह बांधकामाचे टेन्डर आमदार निधीतुन मंजुर झाले होते. वाय पी डेव्हलपर्स औरंगाबाद, यांनी सदर सभागृहाचे बांधकाम पुर्ण करण्याचे काम मला दिले होते. सभागृहाचे बांधकाम मी दोन वर्षापुर्वी पुर्ण केलेले आहे. थोडेकाम ज्यात फरशीचे कलरचे काम पैशा अभावी बाकी राहिले आहे. लकडाऊन चालू होता त्या दरम्यान माझे कामाचे पेमेंट मिळाले नव्हते. तीन ते चार महिन्यापुर्वी सांर्वजनिक बांधकाम विभागा कार्यालय पदमपुरा, औरंगाबाद येथील इंजिनियर (जेई) श्री.पाटील हे मारोती मंदीर मुकंदनगर येथे कामाचे ठिकाणी आले होते. तेथे त्यांनी सभागृहाचे बांधकामाची पाहणी केली व काम.मध्ये वाढीव बांधकाम करण्यास सांगुन 50 हजार रुपयाचे अधिक काम करण्यास सांगितले होते. मी त्यांनी सांगीतले प्रमाणे ते काम पुर्ण केले. त्यानंतर मी त्यांचेकडे माझे कामाचे पेमेंट काढण्याबाबत मागणी केलीहोती. त्याकामाचे बिलाचे पैसे अद्यापर्यंत काढले नाहीत आणि मी केलेल्या कामाच्या खर्चापेक्षा कमी बिल काढणार असल्याचे त्यांनी सांगितले होते म्हणुन मी दिनांक 09/03/2022 रोजी श्री पाटील यांची सार्वजनिक बांधकाम विभाग पदमपुरा येथे जाऊन भेटलो, असता त्यांनी सांगीतले मी तुमचे बीलाचे रक्कम काढुन देतो, परंतु तुम्ही मला तुमचे काढलेल्या बीलाच्या रक्कमेतुन सव्वा लाख रुपये द्यावे लागतील. नाईलाजास्तव काहीतरी पैशाची व्यवस्था करुन येतो असे श्री पाटील सार्वजनिक बांधकाम विभाग पदमपुरा यांना सांगितले. माझ्या जवळ पैसे नाही मला श्री पाटील इजिनिअर सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कोणतीही लाच रक्कम देण्याची इच्छा नाही म्हणुन मी लाचलुचपत प्रतिबंध विभाग औरंगाबाद येथे आज रोजी आलो असुन मी दिनांक 11/03/2022 रोजी श्री पाटील साहेबांना भेटण्यासाठी जाणार आहे, ते माझे बील काढण्यासाठी माझ्याकडे पैश्याची मागणी करण्याची शक्यता आहे त्यामुळे माझ्याकडे श्री पाटील यांनी मागणी केलेल्या लाचेची रक्कम ते स्वत: किंवा इतरांमार्फत स्विकारल्यास त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करावी. श्री पाटील यांच्या बरोबर माझे कोणतेही देवाण-घेवाण,उसणवारी अथवा व्यवहारीक देवाण-घेवाण नाही. म्हणुन माझी त्यांच्याविरुध्द कायदेशीर तक्रार आहे. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी मी दिलेली तक्रार उपस्थितीत असलेले शासकीय पंचाना वाचावयास दिली पंचानी ती तक्रार वाचल्यानंतर त्यावर पंचानी सह्या केल्या व पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी सदर तक्रारीवर समक्ष म्हणुन सही केली. दिनांक 11/03/2022 रोजी पोउपअधिक्षक श्री गांगुर्डे यांनी माझ्या तक्रारीची लाचमागणी पडताळणी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग पदमपुरा औरंगाबाद येथे जाण्याचे ठरविले. मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य आम्ही सर्वजण सार्वजनिक

बांधकाम विभाग, पदमपुरा औरंगाबाद कडे मोटर सायकलने रवाना झालो. सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा कार्यालयाचे अलीकडे सुरक्षीत ठिकाणी पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी दुचाकी वाहन थांबवीले. त्या पाठोपाठ सापळा पथकातील कर्मचारी आले. सदर ठिकाणी पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी मला, पंचास व पडताळणी पथकास आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1) श्री रविंद्र कांबळे असे श्री पाटील यांची भेट घेण्यासाठी रवाना होण्यापुर्वी पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांचे सुचने प्रमाणे श्री नागरगोजे यांनी मला व्हाईस रेकर्डर चालु करुन दिला. त्यानंतर मी व पंच श्री कांबळे असे श्री.पाटील, यांना भेटण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा कार्यालयात माझ्या मोटर सायकलवर 12.10 वाजता रवाना झालो.मी सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा कार्यालय औरंगाबाद येथे गेलो असता माझी श्री. पाटील यांच्याशी भेट झाली. त्यावेळी माझी व श्री. पाटील यांच्याशी मी केलेल्या कामाच्या बिलाचे पैसे काढुन देण्याबाबत चर्चा झाली. त्यानंतर श्री पाटील मला म्हणले की, जे काय तुम्ही मला कमी द्या, म्हणजे सव्वा होते मला एकच द्या तुम्ही, असे करा तुम्ही, त्यावर मी त्यांना म्हणलो की, एकच , त्यावर श्री पाटील म्हणले की, असे करा तुम्ही, त्यावर मी म्हणलो की, एक लाख , त्यावर श्री पाटील म्हणले की, हा.. असे म्हणुन श्री.पाटील म्हणले की, फक्त हे तुम्ही आता पन्नास हजार आणुन द्या, असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच असे सापळा कारवाईचे पथक थांबलेल्या ठिकाणी 12.52 वाजता परत आलो. त्यानंतर सापळा पथकातील श्री नागरगोजे यांनी माझ्याकडील व्हाईस रेकर्डर बंद केला. त्यानंतर आम्ही सर्वजन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय औरंगाबाद येथे आलो. तेथे पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे व पंच यांनी व्हाईस रेकर्डरमधील रेकर्डर मधील रेकर्डींग ऐकली. त्यामध्ये श्री पाटील यांनी 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने उद्या दिनांक 12/03/2022 रोजी लाचेची 50,000 हजार रक्कम देण्याचे ठरले. माझ्याकडे 50,000 हजार रुपये रक्कम नसल्याने मी आज दिनांक 12/03/2022 रोजी माझे नातेवाईक कडुन 40 हजार रुपये उपलब्ध करुन घेतले. सदर उपलब्ध करुन दिलेल्या रक्कम ही पंचासमक्ष व श्री गांगुर्डे साहेब यांनी मान्य करुन श्री पाटील यांना 40,000 हजार रुपये लाच म्हणुन रक्कम देण्याची ठरवुन रक्कम घेऊन पाठविण्याचा सर्वनुमते निर्णय झाला. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी सापळा पथक व पंचाना सापळा कारवाई बाबत थोडक्यात माहीती दिली व श्री. पाटील यांनी लाच स्वीकरल्यानंतरचा नियोजीत ईशारा करण्यास सांगीतले. अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावुन सांगुन त्यांचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले व मी आणलेली लाचेची रक्कम 40,000/- रुपये च्या भारतीय चलनी नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन लाचेची रक्कम श्री.पाटील यांना देण्याकरीता माझे पन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे माझे मोटर सायकलवर व पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे व पंच क्रमांक 2, पथकातील दोन अमलदार शासकीय वाहन क्रमांक एम.एच.20 एयु- 2525 ने व उर्वरित सापळा कारवाई सदस्य हे दुचाकीने उल्का नगरी येथील इंडीयन पेट्रोल पंप जवळील, परिसरात रवाना होवुन सुरक्षीत ठिकाणी पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी त्यांचे शासकीय वाहन थांबवीले. त्या पाठोपाठ आम्ही त्यांच्या मागे आलो. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांच्या सुचनेवरुन पोना/नागरगोजे यांनी व्हाईस रेकर्डर चालु करुन माझ्याकडे दिला. त्यानंतर मी व पंच श्री. कांबळे यांचेसह सुरक्षित ठिकाणाहुन माझ्या दुचाकीने 15.10 वाजता रवाना झालो व त्या पाठोपाठ मागुन सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी कोणासही संशय येणार नाही अशा रितीने येवुन कार्यालयाचे आजुबाजुला सापळा लावुन थांबले. त्यानंतर मी श्री पाटील यांना भेटलो असता श्री पाटील म्हणले की, पन्नास आहे त्यावर मी म्हणलो की, अ.. नाही चाळीस आहे सर, दहा तुम्हाला नंतर देतो, असे म्हणुन श्री पाटील यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर पुर्वनियोजीत इशारा केला ती वेळ 15.20 वाजताची होती. त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी, पंच क्र 2 असे सदर घटनास्थळी आले. त्यानंतर सापळा पथकाने श्री पाटील यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांचे सुचनेवरुन पंच क्रमांक 2 यांनी आलोसे श्री. पाटील यांनी परिधान केलेल्या पन्टच्या उजव्या बाजुच्या समोरील खिशातुन ठेवलेली लाचेची रक्कम 40,000/- रुपये हस्तगत केली. त्यानंतर श्री. पाटील यांना पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी स्वत:चा परिचय देवुन त्यांचे संपुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव संजय राजाराम पाटील वय 52 वर्ष धंदा- नौकरी, पद - शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यालय पदमपुरा, औरंगाबाद रा. D-1, गुरुगणेश अपार्टमेन्ट, रिध्दी सिध्दी हलच्या बाजुला,उल्कानगरी, औरंगाबाद असे सांगीतले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे, सापळा पथक, दोन्ही पंच, मी व आरोपी लोकसेवक श्री संजय पाटील असे तिथुन निघुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद येथे आलो. सदर सर्व घटनेबाबत सविस्तर पंचनामे करण्यात आले आहे.करीता दिनांक 11/03/2022 रोजी आरोपी लोकसेवक श्री संजय राजाराम पाटील वय 52 वर्ष धंदा- नौकरी, पद - शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यालय पदमपुरा, औरंगाबाद रा. D-1, गुरुगणेश अपार्टमेन्ट, रिध्दी सिध्दी हलच्या बाजुला,उल्कानगरी, औरंगाबाद यांनी मी केलेल्या कामाचे बील काढुन देण्यासाठी सव्वा लाख रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 1 लाख रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन आज दिनांक 12/03/2022 रोजी माझ्याकडुन 40,000/- हजार रुपये लाचेची रक्कम स्वत:चे फायदयाकरीता लाचेची रक्कम 15.20 वाजता रिध्दी सिध्दी हल समोरील रोडवर स्वीकारली म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे. समक्ष हि फिर्याद दिली.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम** हाती घेतले): SANTOSH ASHOK PATIL(I (Inspector)) / POBN45678 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे **अधिकार दिले) or** (किंवा)

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.** (आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

वाघमारे

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ड्यूटी ऑफिसर

**Signature of Officer in charge, Police Station:** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SANTOSH ASHOK PATIL

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN45678

PSI = गायके